**MHNS160012682021**

-

# नियमीत दिवाणी दावा क्र. १०८/२०२१ मध्ये निशाणी ६८ खाली आदेश

**प्रकाश हिरे वि.रंजनाबाई हिरे**

१. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदरचा अर्ज त्यांना लेखी कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेल्या १०३५ दिवसांचा विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की वादीने सदरचा दावा खरेदीखतकरुन मिळण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ला दाव्याचे समन्स नोटीसची बजावणी झालेली नाही. प्रतिवादी क्र. १ व ४ यांना सदर दाव्याची माहिती डिसेंबर २०२४ मध्ये झाल्यानंतर ते दाव्यामध्ये हजर झाले. मात्र सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व ४ विरुद्ध विनाकैफियतचा आदेश दि.०१.०४.२०२२ रोजी झालेला आहे. पुढे प्रतिवादींनी कथन केले आहे की प्रतिवादी क्र. १ व ४ या वयस्कर असून नेहमी आजारी असतात. त्यामुळे त्यांना दाव्यास लेखी जबाब व कैफियत देण्यासाठी आवश्यक ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे त्यांना वेळेत दाव्याला कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही व त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व ४ यांना त्यांचा लेखी जबाब व कैफियत दाखल करण्यास १०३५ दिवसांचा विलंब झालेला आहे. तो विलंब माफ होऊन प्रतिवादी क्र. १ व ४ ची लेखी कैफियत व जबाब प्रस्तुत कामी दाखल करुन घेण्यासाठी प्रतिवादींनी अर्ज दिलेला आहे.

२. वादींनी सदर अर्जाला त्यांचे म्हणणे दिले असून त्यात त्यांनी कथन केलेले आहे की अर्जातील कारण संयुक्तिक नाही. प्रतिवादींना कैफियत व लेखी जबाब देण्यासाठी का विलंब झाला ते त्यांनी अर्जामध्ये योग्यरितीने नमुद केलेले नाही.

सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व ४ चा अर्ज वाचला. त्यावरील वादीचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी त्यांच्या अर्जामध्ये कथन केले आहे की त्यांना दाव्याच्या समन्सची/नोटीसची बजावणी झाली नाही तरी देखील त्यांच्याविरुद्ध विना कैफियत/जबाबाचा आदेश पारित केलेला आहे. मात्र त्यांना जेव्हा सदर दाव्याची माहिती झाली तेव्हा ते डिसेंबर २०२४ मध्ये प्रस्तुतकामी हजर झाले. तथापि, संचिकेचे अवलोकन करता असे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना रजिस्टर पोस्टाने दाव्याचे समन्स/नोटीस पाठविलेले असून त्यांचे ट्रॅक रिपोर्ट वादीने निशाणी १९ ते २२ कडे दाखल केलेले आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दि. ०४.०२.२०२२ रोजीच दाव्याचे समन्स/नोटीसची बजावणी झाल्याचे दिसून येते. वादीने निशाणी १९ ते २२ कडे दाखल केलेल्या ट्रॅक रिपोर्टवरुन हे स्पष्टपणे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दि. ०४.०२.२०२२ रोजी सदर दाव्याच्या समन्स/नोटीसची रजिस्टर पोस्टाने बजावणी झालेली आहे व त्यानंतर पुरेशी संधी देऊन माझ्या विद्वान पूर्वाधिकाऱ्यांनी प्रतिवादी क्र. १ व ४ विरुद्ध विनाकैफियतचा आदेश दि. ०१.०४.२०२२ रोजी पारित केलेला आहे. अभिपटलावरील दाखल कागदपत्रांवरुन हे स्पष्टपणे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दाव्याच्या समन्सची योग्य बजावणी होऊन देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध दि.०१.०४.२०२२ रोजी विनाकैफियतचा आदेश झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व ४ ने त्यांच्या अर्जात जे नमुद केले आहे की त्यांना सदरच्या दाव्याची समन्स/नोटीस आजपावेतो मिळालेली नाही या विधानात काहीही तथ्य नाही व ते वस्तुस्थितीसुसंगत नाही.

४. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की त्यांना त्यांचा लेखी जबाब व कैफियत देण्यास १०३५ दिवसांचा विलंब झाला. त्यामुळे तो विलंब माफ होऊन मिळण्याची विनंती त्यांनी सदर अर्जाद्वारे केली आहे. वादींनी सदर अर्जाला तीव्र आक्षेप नोंदविला असला तरी प्रतिवादी क्र. १ व ४ ची कैफियत व लेखी जबाब

अभिपटलावर घेतल्यास त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र. १ व ४ यांना त्यांची कैफियत अभिपटलावर घेण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला धरुन आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ ची कैफियत अभिपटलावर घेतल्यास दाव्याचा योग्य गुणदोषावर अंतिमतः निकाल लागण्यास मदतच होणार आहे. मात्र प्रतिवादी क्र. १ व ४ यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास १०३५ इतक्या जास्त दिवसांचा विलंब झालेला आहे. ज्यामुळे विनाकारण सदर दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व ४ मुळे प्रस्तुत कामी झालेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर जबर दंड बसविणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. सबब, वरील विवेचनाच्या आधारे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – आदेश –

१. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी वादीला रक्कम रुपये १०००/– इतकी दंडात्मक रक्कम देण्याच्या अटीवर प्रतिवादींचा सदरचा विलंब माफीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदर दंडाची रक्कम वादींना दिल्यानंतरच त्यांना लेखी कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला १०३५ दिवसांचा विलंब माफ होईल व त्यांची कैफियत अभिपटलावर घेण्यात येईल याची प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी नोंद घ्यावी.

३. सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे दोन्ही पक्षकारांना निर्देशित करण्यात येते की त्यांनी दाव्याचे काम जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.25 17:40:43 +0530

दिनांक :– २४.०७.२०२५
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दि. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.

**MHNS160012682021**

-

<u>**नियमीत दिवाणी दावा क्र. १०८/२०२१ मध्ये निशाणी ६६ खाली आदेश**</u>

**प्रकाश हिरे वि.रंजनाबाई हिरे**

१. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी त्यांच्याविरुद्ध झालेला विनाकैफियतचा आदेश सेट ॲसाईड होऊन मिळण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी नमुद केले आहे की वादीने प्रतिवादींविरुद्ध सदरचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादींना दाव्याची समन्स/नोटीस आजपावेतो बजावणी झालेली नाही. सदर दाव्याची माहिती झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व ४ स्वतः डिसेंबर २०२४ मध्ये हजर झाले व त्यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. पुढे या अर्जात कथन केले आहे की प्रतिवादी क्र. १ व ४ हे वयस्कर असून नेहमी आजार असतात. त्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती वेळेत न मिळाल्यामुळे त्यांची कैफियत वेळेमध्ये दाखल करता आली नाही. मात्र सदर दाव्यामध्ये ते अत्यंत महत्वाचे पक्षकार असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध झालेला विनाकैफियतचा आदेश सेट असाईड करुन त्यांची कैफियत अभिपटलावर घेण्याची विनंती सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १ व ४ ने केली आहे.

२. वादीचे वकिलांनी सदर अर्जाला त्यांचे म्हणणे दिले असून त्याद्वारे त्यांनी सदर अर्जाविरुद्ध तिव्र आक्षेप नोंदविलेला आहे. सदर अर्जातील कारण समर्थनीय नसल्यामुळे तो जबर दंडासह नामंजूर करण्याची विनंती वादीच्या विधिज्ञांनी केली आहे.

३. प्रतिवादींनी १ व ४ चा अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात नमुद केले आहे की सदर दाव्याचे समन्स नोटीसची बजावणी त्यांना झाली नाही तरी देखील त्यांच्याविरुद्ध

प्रस्तुत कामी कैफियत नाहीचा आदेश पारित केलेला आहे. सदर दाव्याची त्यांना प्रतिवादी क्र. ५ कडून माहिती कळाल्यामुळे ते प्रस्तुतकामी हजर झाले. त्यामुळे त्यांना प्रस्तुतकामी वेळेमध्ये त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ व ४ ने केली आहे.

५. अभिपटलाचे अवलोकन करता असे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ व ४ यांना रजिस्टर पोस्टाने दाव्यचे समन्स/नोटीस पाठविलेले असून प्रस्तुतकामी त्याचा ट्रॅक रिपोर्ट निशाणी १९ ते २२ कडे दाखल केलेला आहे. त्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दि. ०४.०२.२०२२ रोजीच सदर दाव्याच्या समन्सची/नोटीसची बजावणी झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व ४ यांना पुरेशी संधी देऊनही ते प्रस्तुतकामी हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरुद्ध दि.०१.०४.२०२२ रोजी विना कैफियतचा आदेश पारित झालेला आहे. अभिपटलावर निशाणी १९ ते २२ वर दाखल केलेल्या ट्रॅक रिपोर्टवरुन हे स्पष्टपणे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना सदर दाव्याची नोटीस/समन्स रजिस्टर पोस्टाने मिळालेली आहे असे असतांना प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी त्यांच्या अर्जात त्यांना दाव्याचे समन्स व नोटीस / बजावणी झाली नसल्याचे नमुद केले आहे. ज्यामध्ये कोणतेही तथ्य नाही व ते अभिपटलावरील दाखल कागदपत्रांचा व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ चे हे कथन सत्य वस्तुस्थितीनुसार नसल्याचे देखील स्पष्टपणे दिसून येते. अभिपटलावरुन हे स्पष्टपणे दिसून येते की प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दाव्याच्या समन्सची रजिस्टर पोस्टाने बजावणी होऊन देखील ते न्यायालयात हजर न झाल्यामुळे त्यांच्याविरुद्ध विनाकैफियतचा आदेश पारित केलेला आहे. तथापि, प्रतिवादींची कैफियत अभिपटलावर घेतल्यास त्यामुळे दाव्याचा योग्य अंतिमतः निकाल लागण्यास मदतच होणार आहे. प्रतिवादींची कैफियत अभिपटलावर घेतल्यास त्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे हे देखील नैसर्गिक न्याय तत्वाला धरुन आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ मुळे प्रस्तुत कामी जो विनाकारण विलंब झाला त्यासाठी प्रतिवादींवर जबर दंड बसवता येऊ शकतो. सबब,

प्रस्तुत दाव्याचा गुणागुणावर अंतिमतः योग्य निर्णय होण्यासाठी वरील विवेचनाच्या आधारे मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – आदेश –

१. प्रतिवादी क्र. १ व ४ यांचा सदरचा अर्ज त्यांनी रक्कम रुपये ५००/– तालुका विधी समिती चांदवडकडे भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदरची दंडाची रक्कम भरल्यानंतरच त्यांची कैफियत अभिपटलावर घेण्यात येईल याची प्रतिवादींनी नोंद घ्यावी.

३. सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे दोन्ही पक्षकारांना निर्देश देण्यात येतात की त्यांनी दाव्याचे काम जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.25 17:40:52 +0530

दिनांक :– २४.०७.२०२५
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दि. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.